# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 14 May 2024
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १४ मे २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातली मतदान प्रक्रिया पूर्ण–राज्यात २९८ उमेदवारांचं राजकीय भवितव्य मतदान यंत्रात बंद
- औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात सुमारे ६१ टक्के, जालना ६८ तर बीड मध्ये सुमारे ७० टक्के मतदान
- केज तालुक्यात कोरडेवाडी ग्रामस्थांचा साठवण तलावाच्या मागणीसाठी मतदानावर बहिष्कार
- मुंबईत जाहिरातीचा महाकाय फलक कोसळून १४ जणांचा मृत्यू तर ७४ जण जखमी

आणि

- सीबीएसईचा दहावी तसंच बारावीचा निकाल जाहीर

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात नऊ राज्यांसह एका केंद्रशासित प्रदेशातल्या एकूण ९६ मतदारसंघांत, काही किरकोळ अपवाद वगळता काल मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. मराठवाड्यातल्या जालना, बीड आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघासह राज्यातल्या ११ मतदारसंघातल्या २९८ उमेदवारांचं राजकीय भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं. या सर्व अकरा मतदार संघात मतदानाची वेळ संपली तोपर्यंत सुमारे ५९ पूर्णांक ६४ टक्के मतदान नोंदवलं गेलं.

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात ६० पूर्णांक ७३ शतांश टक्के, जालना ६८ पूर्णांक ३०, बीड ६९ पूर्णांक ७४, नंदुरबार ६७, जळगाव ५३ पूर्णांक ६५, रावेर ६१

पूर्णांक ३६, मावळ सुमारे ५३ टक्के, पुणे ५१ पूर्णांक २५, शिरूर ५१ पूर्णांक ४६, अहमदनगर ६२ पूर्णांक ७६ तर शिर्डी लोकसभा मतदारसंघात ६१ पूर्णांक १३ टक्के मतदानाची नोंद झाली.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या अनेक मतदान केंद्रांवर सायंकाळी उशीरापर्यंत मतदारांच्या रांगा दिसून आल्या. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दिलीप स्वामी यांनी याबाबत अधिक माहिती दिली...

***''लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा अंतर्गत औरंगाबाद लोकसभा मतदार संघामध्ये ६ वाजताची मतदानाची वेळ संपल्यानंतर जवळ जवळ १६ ते १८ ठिकाणी मतदार येऊन रांगेत उभे राहिले होते, त्या ठिकाण्च्या केंद्राअधयक्षांनी त्या उभे असलेल्या सर्व मतदारांना चिठ्ठीयाचं वाटप केलं आणि त्या सर्व चिठ्ठिया वाटप केलेल्या मतदाराचं मतदान होईपर्यंत त्याठिकाणी मतदान प्रक्रिया सुरू होती. या मतदान प्रक्रियेमध्ये ज्यांनी ज्यांनी सहकार्य केलेला आहे त्या सर्वांचं मी मणापासून अभिनंदन करतो, ज्या मतदारानीं मतदान केलेला आहे त्यांचंसुद्धा मी मणापसून अभिनंदन करतो.''***

****

दरम्यान, निवडणूक आयोगाला द्याव्या लागणाऱ्या अहवालांसह वेबकास्टिंगमध्ये जालना लोकसभा मतदारसंघ निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात पहिल्या क्रमांकावर राहिल्याची माहिती, जालन्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली.

जालना, बीड तसंच औरंगाबाद लोकसभा मतदार संघात नवमतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. आपला हा नवीन अनुभव त्यांनी आकाशवाणीशी बोलतांना व्यक्त केला...

****

बीड जिल्ह्यात केज विधानसभा मतदार संघातल्या कोरडेवाडीच्या ग्रामस्थांनी मतदानावर सामुहिक बहिष्कार टाकला. ग्रामस्थांनी साठवण तलावाच्या मागणीसाठी ही भूमिका घेतल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. जिल्हा प्रशासनाने या ग्रामस्थांशी चर्चा केली. मात्र ग्रामस्थ आपल्या निर्णयावर ठाम राहिल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. या समस्येवर लवकरच तोडगा काढला जाईल, अशी माहिती, बीडचे उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी दिली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या मतदान केंद्रांवर मतदान करण्यासाठी आलेल्या महिला मतदारांच्या बालकांना सांभाळण्यासाठी पाळणाघराची व्यवस्था करण्यात आली होती. वेबकास्टिंगच्या माध्यमातून मतदान केंद्रांवर लक्ष ठेवलं जात होतं. शहरात सहा जणांनी मतदानानंतर बोटावरची शाई पुसल्याचा प्रकार निदर्शनास आला, या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. जिल्ह्यात वैजापूर इथं पाच आणि गंगापूर इथं दोन मतदान यंत्रं बंद पडली होती. मात्र, प्रशासनातर्फे यावर तातडीनं कार्यवाही करत मतदान यंत्र बदलली. त्यानंतर या ठिकाणी शांततेत मतदान झालं.

****

जालना जिल्ह्यातही काही मतदान केंद्रांवर सकाळी मतदान सुरु होण्यापूर्वीच काही मतदान यंत्रात तांत्रिक बिघाड असल्याचं आढळलं. ही यंत्र तातडीनं बदलून दिल्यानं, मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली. जालना शहरात एका तृतीयपंथीय मतदाराने प्रथमच मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर त्यांनी आपल्या भावना या शब्दांत व्यक्त केल्या..

****

राज्यात निवडणुकीच्या पाचव्या आणि अखेरच्या टप्प्यातल्या प्रचारात वेग आला आहे. यात राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघांचा समावेश आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल महायुतीचे उमेदवार सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ धुळ्यात, तर पालघरचे उमेदवार हेमंत सावरा यांच्या प्रचारार्थ वसई इथं सभा घेतली.

दरम्यान, महाविकास आघाडीची १७ मे रोजी वांद्रे कुर्ला संकुलात संयुक्त प्रचार सभा होणार आहे. या सभेला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शरद पवार यांच्यासह अनेक नेते सहभागी होणार आहेत.

****

मुंबई, ठाणे, कल्याण आदी भागात काल अवकाळी पावसानं जोरदार हजेरी लावली. सोसाट्याच्या वाऱ्यासह आलेल्या या पावसात मुंबईच्या घाटकोपर इथं काल एका पेट्रोल पंपावरचा जाहिरात फलक कोसळला. यात १४ जणांचा मृत्यू झाला, तर ७४ जण जखमी झाले. राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकाच्या तुकडीसह,

पोलिस, अग्निशमन दल आणि इतर यंत्रणांकडून बचावकार्य सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या घटनेतल्या मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपये मदत आणि जखमींवर शासकीत खर्चाने उपचार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही घटनास्थळी भेट देऊन, उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

****

बिहारचे माजी उपमुख्यमंत्री भाजप नेते सुशील कुमार मोदी यांचं काल नवी दिल्लीत कर्करोगानं निधन झालं, ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज दुपारी पाटण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

****

लातूर इथले मराठवाडा मुक्तिसंग्रामातले ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, पत्रकार जीवनधर शहरकर यांचं काल लातूर इथं वृद्धापकाळाने निधन झालं, ते ९६ वर्षांचे होते. शहरकर यांच्या इच्छेनुसार काल लातूर इथं त्यांचं देहदान करण्यात आलं.

****

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथं एका खासगी वृत्तवाहिनीचे पत्रकार वैभव कनगुटकर यांचं काल सकाळी मतदानाचं वार्तांकन करतांना निधन झालं. सकाळी मतदान प्रक्रिया सुरू होताच, वार्तांकनासाठी मतदान केंद्रावर पोहोचलेले वैभव यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला, त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल केलं असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केलं.

****

मतदानाचं प्रमाण वाढावं, यासाठी प्रशासनासोबतच सामाजिक कार्यकर्तेही प्रयत्न करतांना दिसून येतात. छत्रपती संभाजीनगर इथले सामाजिक भान जपणारे केशकर्तनकार सुमीत पंडित यांनी काल मतदान केलेल्या मतदारांसाठी विशेष योजना राबवली. आकाशवाणीशी बोलतांना त्यांनी या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळाल्याचं सांगितलं...

****

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे दहावी तसंच बारावीचे निकाल काल जाहीर झाले. बारावी परीक्षेला बसलेले ८७ पूर्णांक ९८ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होण्याचं प्रमाण गेल्या वर्षापेक्षा ६५ शतांश टक्क्यांनी

वाढल्याचं सीबीएसईनं सांगितलं आहे. दहावीच्या परीक्षेत ९३ पूर्णांक सहा दशांश टक्के परीक्षार्थी उत्तीर्ण झाले, यामध्ये मुलींचं उत्तीर्ण होण्याचं प्रमाण ९४ पूर्णांक ७५ शतांश टक्के तर मुलांचं उत्तीर्ण होण्याचं प्रमाण ९२ पूर्णांक ७१ शतांश टक्के असल्याचं सीबीएसई कडून सांगण्यात आलं आहे.

****

येत्या रविवारी १९ मे पर्यंत नैऋत्य मौसमी पाऊस दक्षिण अंदमानमध्ये दाखल होईल, अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दरम्यान, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी येत्या १-२ दिवसात उष्णतेची लाट सक्रीय होण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

दरम्यान, हवामान विभागानं आज छत्रपती संभाजीनगर तसंच जालना जिल्ह्याला तर बीड जिल्ह्याला ४८ तासांसाठी यलो अलर्ट दिला आहे.

****

नांदेड-अमृतसर-नांदेड सचखंड एक्सप्रेस येत्या १६ मे पर्यंत जाखल, धुरी, लुधियाना या मार्गाने धावणार आहे. दक्षिण मध्य रेल्वेकडून ही माहिती देण्यात आली.

****